ePaper

| वर्ष - 6 | अंक - 226 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 29 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सत्तासंघर्षाची सुनावणी लांबणीवर, सुप्रीम कोर्टातून मोठी अपडेट



### आतील पानांत

■ बाईक टॅक्सी ॲपवर १० डिसेंबरपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासन

■ गरिबांची 'सवारी' बंद

■ मराठा आरक्षणासंदर्भातील फेरविचार याचिका रखडली; तांत्रिक बाबींमुळे संभ्रम

# सफाई कामगारांना प्रशिक्षण!

## प्रशासनाची तयारी : 'स्वच्छ सर्वेक्षणात' आव्वल येण्याचा संकल्प

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**




स्वच्छ सर्वेक्षणाच्या नियोजनाची अंतिम अंमलबजावणी सफाई कर्मचाऱ्यांच्या मार्फत होत असते. कामाचे स्वरूप व जबाबदारीची माहिती करून दिल्यास कामाच्या गुणवत्तेत सुधारणा होत असते. स्वच्छतामित्र म्हणून भूमिका बजावत असताना ते अधिक प्रभावीपणे करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होणार असून त्यासोबत सफाई कर्मचारी व त्यांच्या पाल्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी त्यांना योजनांची संपूर्ण माहिती व त्यांची नोंदणी या प्रशिक्षणादरम्यान करून घेतली जात आहे असा दुहेरी उद्देश या प्रशिक्षणाच्या माध्यमातून साध्य होत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी केले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात अव्वल स्थानावर येण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या संबंधित अधिकारी, कर्मचारी व विभाग यांच्या कामकाजाचे स्वरुप व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. याबद्दल सविस्तर माहिती देण्यासाठी दोन टप्प्यांत ४ ठिकाणी सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात क आणि ग क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कर्मचा-यांचे प्रशिक्षण आज आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, शीतल वाकडे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भावसार, कॅम फाउंडेशनचे प्रणव टोम्पे, डिव्हाईन या माध्यम संस्थेचे प्रतिनिधी तसेच सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात क आणि ग कार्यालयांच्या अधिनस्त असलेल्या ऑक्टोबर २०२२ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करणा-या सफाई कर्मचाऱ्यांना अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा भावसार यांनी शासकीय योजनांची माहिती दिली. सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या प्रियांका कापोरे यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मोफत रोजगारभिमुख शिक्षण आणि कोर्सेसबद्दल माहिती यावेळी सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे यांनी केले तर सूत्रसंचालन पौर्णिमा भोर यांनी केले.

> पिंपरी चिंचवड शहराला देशातील सर्वात स्वच्छ आणि सुंदर शहर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शहरातील प्रत्येक घरात कचऱ्याचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. सुक्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती आणि ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करण्याचा महापालिकेचा मानस आहे. शहरातील सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता ठेवण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरु आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सफाई कर्मचा-यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी ते अतिशय प्रामाणिकपणे आणि उत्कृष्ट पद्धतीने पार पाडत आहेत. तसेच महापालिकेच्या सर्व सफाई कर्मचा-यांना आणि त्यांच्या पाल्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा यासाठी महापालिकेचा पाठपुरावा सुरु आहे. त्यास सर्वांनी प्रतिसाद द्यावा.
>
> **- जितेंद्र वाघ, अतिरिक्त आयुक्त.**

# पिंपरी-चिंचवडकरांना सुविधा देणे हे कर्तव्यच !

## माजी नगरसेवक शकर जगताप : सोसायट्यांमध्ये ओपन जीमचे साहित्य भेट

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी लोकसभा, विधानसभा तसेच महापालिका आणि अन्य निवडणुकांमध्ये भाजपावर भरभरून प्रेम केले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना सर्व प्रकारच्या सुविधा देणे हे आमचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी केले.

आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्थानिक आमदार विकासनिधीतून वाकड येथील प्रिस्टाइन प्रोलाइफ फेज-१ आणि आर के लाइफस्पेस सोसायटी या दोन गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये ओपन जिमचे साहित्य बसवण्यात आले आहे. या ओपन जिमचे भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्थायी समितीच्या माजी सभापती ममता गायकवाड, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, भारती विनोदे, राम वाकडकर, गणेश कस्पटे, रामदास कस्पटे, रणजीत कलाटे तसेच दोन्ही गृहनिर्माण सोसायट्यांचे सभासद व नागरिक उपस्थित होते.

> "पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी लोकसभा, विधानसभा तसेच महापालिका आणि अन्य निवडणुकांमध्ये भाजपावर भरभरून प्रेम केले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना सर्व प्रकारच्या सुविधा देणे हे भाजपाचे कर्तव्य आहे. या कर्तव्य भावनेतूनच लोकप्रिय आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्थानिक विकासनिधीतून चिंचवड विधानसभा मतदारसंघातील गृहनिर्माण सोसायट्यांना जागा उपलब्ध असेल त्याठिकाणी ओपन जिमचे साहित्य दिले गेले आहे. या ओपन जिमचा वापर करून नागरिकांनी आपले आरोग्य उत्तम राखावे. नागरिकांनी मतदानरूपी दिलेल्या आशिर्वादाची परतफेड विकासाच्या माध्यमातून यापुढेही करत राहू.
>
> **- शंकर जगताप, निवडणूक प्रभारी, चिंचवड, भाजपा.**

# बाईक टॅक्सी ॲपवर 10 डिसेंबरपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासन

## पुण्यातील रिक्षाचालकांचा बंद अखेर मागे

**पुणे । महाईन्यूज ।**

**बाईक टॅक्सी ॲपवर १० डिसेंबरपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर पुण्यातील रिक्षाचालकांनी सोमवारी बंद मागे घेतला. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या आदेशानुसार हवेली तहसीलदार तृप्ती कोलते यांनी आंदोलनस्थळी येऊन रिक्षाचालकांची भेट घेतली. त्यावेळी कोलते यांनी आश्वासन दिल्यानंतर रिक्षाचालकांनी संप मागे घेतला. परंतु, १० डिसेंबरपर्यंत बाईक टॅक्सी ॲप बंद झाले नाही तर पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा रिक्षाचालकांनी दिला आहे.**



शहरात अनधिकृतपणे सुरू असलेल्या दुचाकी टॅक्सीवर बंदी घालण्याच्या प्रमुख मागणीसाठी शहरातील रिक्षा संघटनांनी सोमवारी मोठ्या संख्येने मोर्चा काढून बंद पुकारला होता. दिवसभर शहरातील बहुतांश रिक्षा बंद राहिल्याने प्रवाशांचे हाल झाले. रिक्षा चालकांच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय होईपर्यंत बंद कायम ठेवण्याचा निर्धार आंदोलनात सहभागी रिक्षा संघटनांकडून व्यक्त करण्यात आला होता. अखेर हवेली तहसीलदार तृप्ती कोलते यांच्या बाईक टॅक्सी ॲपवर १० डिसेंबरपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासनानंतर रिक्षाचालकांनी बंद मागे घेतला.

---

## आचारसंहितेमुळे पुणे जिल्हा ग्रामपंचायतींमधील कामांच्या प्रशासकीय मान्यता लांबणीवर

**पुणे । महाईन्यूज ।**

पुणे जिल्ह्यात २२१ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. परिणामी जिल्हा नियोजन समितीने (डीपीसी) मंजूर केलेल्या या ग्रामपंचायतींच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता लांबणीवर पडल्या आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी जिल्हा परिषदेला दिले आहेत. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या




क्षेत्रातील डीपीसीच्या कामांना आचारसंहिता संपल्यानंतरच मान्यता मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा नियोजन समितीने जिल्ह्यातील विकासकामांचा १०५८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये ग्रामपंचायतींशी निगडित जनसुविधा, रस्ते तसेच निवडणूक होणाऱ्या गावांना जोडले जाणारे इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण रस्ते, आरोग्य केंद्र, सुविधा बंधारे, शाळा दुरुस्ती या स्वरूपाची कामे आहेत. मात्र, या कामांची मंजुरी, त्यांचे आदेश २ नोव्हेंबर रोजी काढण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात या कामांची माहितीपुस्तिका चार-पाच दिवसांनी बाहेर आली. जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत स्पष्ट आदेश प्रसृत केले असून ज्या ग्रामपंचायतींची निवडणूक होणार आहे. त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील कामांच्या प्रशासकीय मान्यता निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर द्याव्यात.

पुणे जिल्ह्यातील २२१ ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. १० नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. १८ डिसेंबरला या निवडणुकांसाठी मतदान होत आहे. निवडणूक आचारसंहितेचा कालावधी २३ डिसेंबर रोजी संपणार असून यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही केली जाणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

## कचरा वाहतुकीसाठी ३२३ कोटींचा खर्च; भाडेकराराने २५७ गाड्या घेण्याचा निर्णय

**पुणे :** कचरा वाहतुकीसाठी सात वर्षांच्या कालावधीसाठी महापालिका २५७ गाड्या भाडेकराराने घेणार आहे. त्यासाठी ३२३ कोटींचा खर्च अपेक्षित असून या खर्चाला महापालिकेने मान्यता दिली आहे. शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या वाहतुकीसाठी सध्या ६९८ गाड्या वापरल्या जात आहेत. त्यापैकी १६१ गाड्यांचे आयुर्मान १५ वर्षांपेक्षा जास्त आहे.

आयुर्मान संपल्याने गाड्या नादुरुस्त झाल्याने कचरा वाहतुकीसाठी या गाड्यांचा वापर करणे महापालिकेसाठी काही प्रमाणात अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे कचरा संकलन आणि



वाहतुकीसाठी गाड्या भाडेकराराने घेण्याचा निर्णय घनकचरा व्यवस्थापन विभागाने घेतला होता. त्यासाठी निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली होती. या प्रस्तावाला स्थायी समितीच्या बैठकीत या मान्यता देण्यात आली. शहरात रोज २२०० टन कचरा निर्माण होतो. शहराच्या विविध भागांतील रॅम्प, कचरा प्रकल्पापर्यंत हा कचरा वाहून नेण्यासाठी मोठी घंटागाडी, डंपर, कॉम्पॅक्टर यांसारख्या सुमारे ८५० वाहनांची आवश्यकता महापालिकेला आहे.

---

# आंबेगाव तालुक्यात गायरान क्षेत्रात अतिक्रमण केलेल्या तीन हजार 267 अतिक्रमण धारकांना नोटीसा

**मंचर । महाईन्यूज ।**

आंबेगाव तालुक्यात ७० गावातील गायरान क्षेत्रातील तीन हजार २६७ अतिक्रमणधारक घर मालकांना उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अतिक्रमण हटविण्याच्या प्रशासकीय कारवाईला वेग आला आहे. देवगाव हे गावच अन्य ठिकाणी स्थलांतरीत करावे लागेल. अशी परस्थिती आहे. नोटीसा आल्याने अतिक्रमण धारकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अतिक्रमण धारकांच्या



विरोधात कारवाई झाल्यास गरीब कुटुंबांचे संसार उघड्यावर येतील. गरीब कुटुंबाना न्याय मिळवून देण्यासाठी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पुढाकार घ्यावा." अशी मागणी इंदिरानगर, निघोटवाडी येथील कुटुंबांनी वळसे पाटील यांना भेटून केली. येथील २७२ कुटुंबाना अतिक्रमण पाडून टाकण्याबाबत प्रशासनाने नोटीसा बजावल्या आहेत. येथे बीड, मराठवाडा भागातुन स्थलांतरित झालेल्या भटक्या विमुक्त समाजातील कुटुंबांची घरे आहेत.

"गायरान जागेतील अतिक्रमण हटवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला होता.त्यानंतर उच्च न्यायालयाने स्वतः दखल घेत अतिक्रमण काढण्यासाठी आदेश दिले आहेत. या संदर्भात तातडीने महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी मोबाईलद्वारे दिलीप वळसे पाटील यांनी संपर्क साधून चर्चा केली. "राज्य शासन नागरिकांना वाऱ्यावर सोडणार नाही.सरकार योग्य तो निर्णय घेईल." अशी ग्वाही विखे पाटील यांनी दिली.

> "हातावर पोट असणाऱ्या अनेक गरिबांची घरे गायरान जमिनीत आहेत. अतिक्रमण विरोधी कारवाईत त्यांची घरे पाडून टाकल्यास त्यांचे संसार उघड्यावर पडतील. सध्या चिंतेत असलेल्या अतिक्रमण धारकांनी घाबरू नका. मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे."
>
> **- दिलीप वळसे पाटील, माजी गृहमंत्री.**

> "ज्या पद्धतीने शहरात गुंठेवारी किंवा अनधिकृत बांधकामांना अधिकृत करून दिले जाते. तसेच या गरीब लोकांना गायरान मधील अतिक्रमण नियमित करून द्यावीत"
>
> **- विवेक वळसे पाटील,माजी उपाध्यक्ष पुणे जिल्हा परिषद.**

# गरिबांची ‘सवारी’ बंद!

## रिक्षा चालकांचा बंद : चाकरमानी, कामगारांचे हाल



**रॅपीडो बाईक बंद होईपर्यंत बेमुदत आंदोलन - बाबा कांबळे**

**खाजगी कंपन्यांचा प्रवासी वाहतूकीमध्ये सहभाग वाढल्याने रिक्षा, टॅक्सी चालकांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागला आहे. त्यात भरीस भर म्हणून रॅपीडो बाईक प्रवासी वाहतूक करत आहेत. या बाबत वारंवार तक्रार करूनही आरटीओ कार्यालय, शासनाचे अधिकारी व नेतेमंडळी दखल घेत नाहीत. त्यामुळे रॅपीडो बाईक पुर्ण बंद होत नाहीत, तो पर्यंत आंदोलन चालूच ठेवणार असल्याचा इशारा बाबा कांबळे यांनी दिला.**

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

रिक्षा चालकांच्या मागण्या केंद्र व राज्य सरकारने वेळीच मान्य करणे गरजेचे होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून सरकारनेच रिक्षा चालकांना संप करायला भाग पाडले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे 20 हजार रिक्षा चालक-मालकांनी संपात सहभाग घेऊन आंदोलनाचे हत्यार उपासले आहे. शहरात रिक्षा बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र रिक्षा पंचायत संस्थापक अध्यक्ष बाबा कांबळे यांनी केले.

बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र रिक्षा पंचायतीने पिंपरी ते पुणे आरटीओ कार्यालयापर्यंत रॅली काढली. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरूवात करण्यात आली. या वेळी बाबा कांबळे बोलत होते.

या वेळी महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे शहराध्यक्ष सोमनाथ कलाटे, लक्ष्मण शेलार, बाळासाहेब ढवळे, रवींद्र लंके, सुरेश सोनवणे, दिनेश तापकीर, तुषार लोंढे, निलेश लंके, अविनाश जोगदंड, हिरामण गवारे आदीसह रिक्षा चालक मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅलीच्या सुरूवातीला पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जाऊन अधिकारी अतुल आदे यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यानंतर पुणे येथील आरटीओ कार्यालयासमोर आंदोलन सुरू असूनही जोपर्यंत मागण्या मान्य होते नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार आहे, लोकशाही व शांततेच्या मार्ग सुरू ठेवावे असे आव्हान देखिल बाबा कांबळे यांनी केले.

---

## विद्यार्थ्यांसह पालकांकडून उपक्रमाचे कौतूक

# संविधानदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

## माजी नगरसेविका आरती चोंधे यांचा पुढाकार

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**भारतीय संविधानाविषयी जाणीवजागृती आणि भारतीय संविधानातील मूलतत्त्वांचा विद्यार्थ्यांनी जबाबदार, सुजाण आणि सुसंस्कृत नागरिक होण्यासाठी आपल्या जीवनात अंगिकार करून त्याद्वारे संविधानाचा योग्य सन्मान करण्याकरिता पिंपळे निलख येथील महानगर पालिकेच्या शाळा क्रं ५२ येथे भारतीय संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले.**



माजी नगरसेविका आरती चोंधे आणि भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांच्या माध्यमातून विद्यार्थांना शालेयपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

यावेळी सुमारे साडे आठशे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन भारतीय जनता युवा मोर्चा अनुसूचित जाती आघाडीचे सहसंयोजक केवल जगताप यांनी केले होते. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल, रबर, स्केल, शार्पनर वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला संकेत चोंधे, प्रदीप जगताप, शौबित घाडगे, पवन कामठे, अमित कांबळे, विवेक जगताप, आकाश वाघमारे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.

**भारतीय राज्यघटनेतील मुलतत्वांची व्याप्ती आणि सर्व समावेशकता सर्व विद्यार्थ्यांना समजावी तसेच घटनेतील मूलतत्त्वे विद्यार्थ्यांच्या मनावर कोरली जावीत यासाठी संविधानाचा परिपूर्ण परिचय विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने विधायक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

**- संकेत चोंधे, शहराध्यक्ष, भाजपा, युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड.**

## संपादकीय »

# मरावे परी अवयवरूपी उरावे!

***एकाच निर्णयाशी संबंधित वेगवेगळ्या व्यक्तींच्या इच्छा आणि हित बहुतेक वेळा परस्परविरोधी असल्यामुळे नैतिक संघर्ष निर्माण होतात.***

वैद्यकीय नीतिमीमांसेतले प्रश्न याला अपवाद नाहीत. कुणाच्या हिताला आणि कुठल्या कारणासाठी प्राधान्य द्यायचे, किती प्राधान्य द्यायचे हे ठरवण्यासाठी वैद्यकीय नीतिमीमांसेतील चार मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग केला जातो. व्यक्तीच्या स्वयंनिर्णयाचा आदर राखणे, रुग्णाचे हित करणे, रुग्णाचे अहित न करणे आणि न्याय ही ती तत्त्वे आहेत. याच तत्त्वांच्या चौकटीत या क्षेत्रातील एका महत्त्वपूर्ण विषयाचा; अवयव प्रत्यारोपणाचा विचार करावा लागतो. गेल्या काही दशकांमधे वैद्यकीय तंत्रज्ञानाने जी थक्क करणारी प्रगती केली आहे, त्यात अवयव प्रत्यारोपणाच्या तंत्राचा फार मोठा सहभाग आहे.

नेत्रदानाबद्दल काही प्रमाणात जागृती झाली आहे. हृदय, मूत्रपिंड, यकृत यासारख्या अवयवांच्या प्रत्यारोपणाच्या बातम्या आपण अनेकदा वाचतो. या तंत्रामुळे अनेकांचे जीव वाचतात, काहींच्या जीवनाच्या गुणवत्तेत मोठाच फरक पडतो. आज जेवढे जीव वाचतात किंवा जेवढ्यांचे जीवन सुधारते, त्यांपेक्षा कित्येक पटींनी जास्त लोकांचा फायदा करून देण्याची क्षमता या तंत्रज्ञानामधे आहे. ती पूर्णपणे वापरात येत नाही, कारण गरजू रुग्णांच्या संख्येला पुरेशा प्रमाणात अवयव उपलब्ध होत हीत. सर्वसामान्यांचे अज्ञान, भीती, गैरसमज यांप्रमाणेच धार्मिक समजुतींचा पगडा, अवयव दानाविषयीचे नैतिक संभ्रम यांसारखी अनेक कारणे यामागे आहेत.

कुठलाही नैतिक पेच सोडवताना आपल्या निर्णयाचे आता किंवा नंतर, कुणा-कुणावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होणार आहेत, हे पाहावे लागते. अवयव प्रत्यारोपणाच्या संदर्भात अवयव-दाता, ज्याला अवयव दिला जाणार आहे तो रुग्ण, दोघांचेही कुटुंबीय यांचा विचार करावा लागतो. अवयव-दाता स्वत: रुग्ण असू शकतो किंवा निरोगी असू शकतो. काही वेळा दाता रुग्णाच्या नात्यातला असतो, पण कधी-कधी अपरिचितही असतो. दात्याने स्वतःच्या मर्जीने आपला अवयव देण्याचा निर्णय घेतलेला असावा लागतो. कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन यांना बळी पडून घेतलेला निर्णय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाविरुद्ध असल्यामुळे अनैतिक असतो. पण जर एखाद्याने पैसे मिळवण्याच्या हेतूने मूत्रपिंड दान करायचे ठरवले, तर ते नीतीला धरून होईल का? अवयवदात्यांना आर्थिक मोबदला दिला जावा का, हा प्रश्न इथे निर्माण होतो. असा मोबदला दिला गेला, तर दात्याच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन स्वत:चा लाभ करून घेणारे मध्यस्थ, डॉक्टर यांची अभद्र साखळी अस्तित्वात येते.

# अंमलबजावणीतील अडथळे!






राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (२०२०) अंमलबजावणीची प्रक्रिया काही राज्यांमध्ये सुरू झाली आहे. महाराष्ट्रामध्येही विद्यापीठीय पातळीवर ही प्रक्रिया सुरू झाली असून, शालेय पातळीवर अद्याप फारशी चर्चा होत असताना दिसत नाही. जी काही चर्चा होत आहे ती उच्च शिक्षणाच्या संदर्भात केली जात आहे. त्यामुळे शालेय विभागाकडे बहुदा दुर्लक्ष केले जात आहे. उच्च शिक्षणातील बदल शालेय शिक्षणातील आमूलाग्र बदलाशिवाय केले जाऊ शकत नाहीत. आज समाजातील जेवढे आर्थिक वर्ग आहेत तेवढ्या प्रकारच्या शाळा आपल्याला दिसतील. सामाजिक उतरंडीला धक्का न लावता किंवा सर्व घटकातील विद्यार्थ्यांना समान दर्जाचे शिक्षण देण्याच्या विचारांना बगल देऊन सर्वत्र डागडुजी करण्याचा प्रयत्न यात दिसतो.

शिक्षक हाच मुळात या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमधील एक मोठा अडथळा दिसतो. तो अडथळा कोणत्या कारणाने आहे, हे नीट समजून घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात तरी किमान शैक्षणिक अनुबंध नीट न स्वीकारल्यामुळे पिढ्यान् पिढ्या यात पिचल्या जात आहेत. याचे एक छोटे उदाहरण पाहू. सर्व प्रकारच्या शासकीय अनुदानित किंवा विनाअनुदानित, किंवा अशासकीय अशा शाळांमधून आठवी इयत्तेपर्यंत अध्यापक पदविका घेतलेले शिक्षक शिकवतात. आज सीबीएसई किंवा अन्य आंतरराष्ट्रीय बोर्डांचे अभ्यासक्रम आणि काठिण्यपातळी पाहता व त्याच्याशी समकक्ष अशा पद्धतीचे अभ्यासक्रम महाराष्ट्रात आणले जात असताना आपली शिक्षक मंडळी तशी प्रशिक्षित नाहीत, हे वास्तव अगोदर समजावून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे सुज्ञ पालक या सगळ्या शाळा सोडून खासगी शाळेकडे धाव घेत आहेत किंवा केवळ स्थलांतर प्रमाणपत्र लागते म्हणून नावाला शासकीय शाळेत प्रवेश घेऊन शहरातील नामांकित शिकवणी वर्गात आपल्या मुलांना शिकवत आहेत. जोपर्यंत असलेल्या शिक्षकांना विविध कार्यक्रमांद्वारे सक्षम केले जाणार नाही किंवा नव्याने असे मनुष्यबळ निर्माण केले जाणार नाही किंवा तशी मंडळी नोकरीत कायमची सेवेत येणार नाहीत, तोपर्यंत तीन-चतुर्थांश विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकणार नाहीत. शिक्षणाच्या मूलभूत हक्काच्या अंमलबजावणीची कितीही आपण घोषणा केली तरी ही शैक्षणिक दरी कधीही भरून येणार नाही.

पदवीधर शिक्षक नावाचे काही विषय शिक्षक सर्वत्र दिसतात. पण ते कोणत्या विषय पदवी घेतलेले आहेत आणि त्यांना कोणते विषय अध्यापनासाठी दिले जातात, याचा साधा आढावा घेतला तरी यातील भीषण वास्तव पुढे येते. भाषा विषय वा एखाद्या सामाजिक विषयामध्ये पदवी (बहुदा मुक्त विद्यापीठातून) घेतलेल्या शिक्षकांना तुम्ही आता इंग्रजी शिकवा, विज्ञान शिकवा किंवा गणित शिकवा म्हणणे त्यांच्यावर तर अन्याय करणारे आहेच; पण मुलांवर अधिक वाईट परिणाम करणारे आहे. आजचा सुज्ञ पालक शाळेतील शिक्षकांमध्ये बदल करू शकत नाही. त्यामुळे त्याच्या हातात फक्त आपल्या पाल्याच्या सुरक्षिततेसाठी शाळा बदलणे तेवढे हातात असते. तो तेच करीत आहे. त्यामुळे उत्तरोत्तर येथील संख्या घटत आहे व खासगी शाळा व शिकवणींची संख्या वाढत आहे. काही अपवादात्मक शासकीय शाळांमध्ये मुले वाढली, याचे कारण त्यांच्या पालकांची क्रयशक्ती करोनाकाळात शून्यावर आली हे आहे; गुणवत्तावृद्धी नाही.

दुसरा अडथळा पालकांचा आहे. २०२२मध्ये सर्व स्तरांतील पालक आपल्या पाल्यांप्रती अत्यंत जागृत व महात्वाकांक्षी झाले आहेत. शिक्षणाची कोणतीही किंमत मोजण्याची त्याची तयारी आहे. व्यावहारिक व भौतिक युगात जे विकते तेच पिकवण्याची मानसिकता बनवून पाल्यांना डॉक्टर, इंजिनिअर आणि प्रशासकीय अधिकारी करण्याची एक जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. वाढती लोकसंख्या, कमी होत असलेले रोजगार यामुळे खात्रीशीर रोजगाराच्या शोधात हे पालक आहेत. यात त्यांचा दोष नाही. आपल्या पाल्याच्या काळजीपोटी ते करतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. पण २५ कोटी विद्यार्थ्यांपैकी सगळेच काही डॉक्टर वा इंजिनिअर होणार नाहीत. मुलांच्या क्षमतेप्रमाणे, आवडीप्रमाणे, कलेप्रमाणे उत्कृष्ट शिक्षण देण्याचा आग्रह धरून किमान शालेय पातळीवर संतुलित व संयत नागरिक घडविण्यासाठी जे जे लागते त्याचा आग्रह केला जात नाही. त्यामुळे क्रीडा, संगीत वा अन्य आवडींना काहीही महत्त्व न दिल्यामुळे एकदम केवळ अधिक गुण घेणाऱ्यांचे कौतुक करणारे पालक, ठरावीक चार-दोन क्षेत्रांत प्रवेश मिळाला नाही म्हणून दूषणे देणारे पालक हा या क्षेत्रातील एक मोठा अडथळा आहे.

# अभियांत्रिकीचा संपन्न वारसा

**इसवी सनानंतर चौदाव्या शतकापर्यंत मानव जात 'हे विश्व कुठल्यातरी अदृश्य शक्तीच्या मर्जीने चालते,' या भयाखाली होती. नंतर आधुनिक विज्ञानाची सुरुवात पश्चिमेत झाली. त्यानंतरच्या पाचशे वर्षांत जणू काही सगळे विश्व विज्ञानाच्या कब्जात आहे, अशा भ्रामक समजुतीपर्यंत येण्याचा मानवाचा प्रवास झाला.**

याच काळात विज्ञानातला प्रत्येक शोध सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी परावर्तित करणाऱ्या शाखेचा जन्म झाला. ती शाखा म्हणजे अभियांत्रिकी-इंजिनीअरिंग. चाकाचा शोध लागला आणि औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. हे युग युरोपमध्ये व त्यातही जर्मनीत उदयास आले. हे इंजिनीअरिंगचे युग होते.

सकाळी उठल्यापासून वापरली जाणारी प्रत्येक गोष्ट अभियांत्रिकीच्या कृपाप्रसादाने प्राप्त झालेली असते. याची घरापासून वाहनांपर्यंत आणि महामार्गांपासून इलेक्टॉनिक वस्तूंपर्यंत असंख्य उदाहरणे देता येतील. आज ॲलोपाथीचे विज्ञान खूप पुढे गेले आहे. पण त्यातही इंजीनिअरिंगची मदत आहे. विज्ञानाने एक्स-रेचा शोध लावल्यावर अभियांत्रिकीने एक्स-रे मशीनचा शोध लावून अचूक निदानाचे एक अस्त्र ॲलोपाथीच्या हाती दिले.



त्यानंतर सिटी स्कॅन, एमआरआय अशी अस्त्रे दिली. एंडोस्कोपी, ॲंजिओग्राफी, इकोकार्डिओग्राफी, कम्प्युटरच्या साह्याने होणाऱ्या रक्त तपासण्या, अचूक निदानांसाठी वापरात असलेल्या सगळ्या गोष्टी अभियांत्रिकीने दिल्या आहेत. केवळ निदानच नाही तर 'कम्प्युटर एडेड की-होल सर्जरी' किंवा 'रोबोटिक सर्जरी' अशा शल्यकर्म क्षेत्रातही अभियांत्रिकी एक एक पाऊल उत्साहाने पुढे टाकते आहे.

आम्ही शिकत असताना 'मेडिकल' किंवा 'इंजिनीअरिंग' या दोनच शाखांना सगळ्यात जास्त महत्त्व होते. तेव्हा दोन्ही शाखांच्या विद्यार्थ्यांमध्ये मजेच्या भांडणाचा मुख्य मुद्दा श्रेष्ठत्वाचा असे. पण आजही प्रामाणिकपणे सांगायचे तर या दोन शाखांमध्ये श्रेष्ठत्वाचा प्रश्न मनात आला तर मला अभियांत्रिकी हीच शाखा श्रेष्ठ वाटते. असे म्हणणे धाडसाचे आहे आणि आता या करोनाच्या काळात तर मार खायला लावणारे आहे. पण तरीही मला प्रामाणिकपणे हेच म्हणावसे वाटते. मेडिकल ही शाखा आयुष्यातून वजा केली, तर समाजातल्या २० ते ३० टक्के लोकांना त्रास होईल वा प्रत्येकालाच आयुष्यात काही वेळा व शेवटच्या काळात जगायचा त्रास होईल. पण अभियांत्रिकी ही शाखा मानवी जीवनातून वजा केल्यास शंभर टक्के जनतेचे रोजचे जगणे किती कठीण होईल हे अभियांत्रिकीने दिलेल्या आयुष्यातल्या गोष्टी वजा करून पाहिल्या तर कळते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा यांच्या खंडपीठापुढे सोमवारी सुनावणी होणार आहे.

ओबीसी आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखविल्यावर त्यावेळेपर्यंत अधिसूचना काढल्या न गेलेल्या काही नगरपालिकांच्या निवडणुकीसाठी ते लागू करण्यात यावे, अशी मागणी आहे. त्याचबरोबर महाविकास आघाडी सरकारने वाढीव लोकसंख्या गृहीत धरून प्रभागसंख्या वाढविली व नव्याने प्रभागरचना करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने हा निर्णय रद्द करून पुन्हा पूर्वीचीच प्रभागसंख्या निश्चित करण्यात आली.राज्य निवडणूक आयोगाचे प्रभागरचनेचे अधिकार राज्य सरकारने आपल्याकडे घेतले आहेत.

# मराठा आरक्षणासंदर्भातील फेरविचार याचिका रखडली; तांत्रिक बाबींमुळे संभ्रम!

## ईडब्ल्यूएस) ला सर्वोच्च घटनापीठाचा हिरवा कंदील मात्र तांत्रिक मुद्दय़ांवर संभ्रमाचे वातावरण

। मुंबई। महाईन्यूज ।

मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या फेरविचार याचिकेवरील सुनावणी गेल्या काही महिन्यांपासून रखडली असून त्यातील त्रुटींमुळे सुधारित मसुदाही सादर होऊ शकलेला नाही. आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या (ईडब्ल्यूएस) आरक्षणास सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने हिरवा कंदील दाखविल्याने मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळू शकेल की नाही, यासह काही तांत्रिक मुद्दय़ांवर संभ्रमाचे वातावरण आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाचे आरक्षण रद्दबातल केल्यावर महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात न्यायालयात फेरविचार याचिका सादर करण्यात आली आहे. आरक्षण रद्दबातल करताना माजी न्या.



गायकवाड आयोगाच्या अहवालातील काही मुद्दे विचारात घेण्यात आले नाहीत व काही परिशिष्टे जोडली गेली नव्हती. त्यामुळे गायकवाड आयोगाचा अहवाल ग्राह्य धरून मराठा समाजाला आरक्षण मिळावे, अशी मागणी फेरविचार याचिकेत करण्यात आली आहे. मात्र राज्य सरकारने सादर केलेल्या फेरविचार याचिकेत काही कायदेशीर त्रुटी असल्याचे मराठा संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्या दूर करून नव्याने मसुदा सादर करण्याबाबत मराठा संघटनांच्या प्रतिनिधींच्या काही बैठका नुकत्याच पार पडल्या आहेत. राज्य सरकारच्या पातळीवरही कायदेशीर बाबींवर विचारविनिमय सुरू असून संघटनांच्या प्रतिनिधींचे मतही विचारात घेतले जाणार आहे.सर्वोच्च न्यायालयाने ईडब्ल्यूएस आरक्षणाला मान्यता दिल्याने एकूण आरक्षणासाठी असलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडली गेली आहे. या परिस्थितीत मराठा समाजाला गेल्या वेळेप्रमाणे वेगळा संवर्ग करून आरक्षण देता येणार नाही. मराठा समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना

> सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिकेचा सुधारित मसुदा सादर करण्यासाठी राज्य सरकारने तातडीने निर्णय घ्यावा आणि सुनावणी घेतली जावी, यासाठी प्रयत्न करावेत. आणखी विलंब करू नये. मराठा समाजाला ओबीसी कोटय़ातून की स्वतंत्र संवर्ग करून आरक्षण द्यावे, यासंदर्भात संघटनांमध्ये विचारविनिमय सुरू आहे.
>
> – ॲड. राजेंद्र कोंढरे, प्रभारी अध्यक्ष, अखिल भारतीय मराठा महासंघ

ईडब्ल्यूएसचे आरक्षण मिळत असल्याने वेगळय़ा आरक्षणाची गरज का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.ओबीसी कोटय़ातून आरक्षण देण्यास त्या समाजघटकांचा जोरदार विरोध असल्याने राज्य सरकारपुढे त्याबाबत निर्णय घेण्याबाबत राजकीय अडचण आहे. काही विभागांमधील मराठा समाजातील नागरिकांकडे ओबीसी जात प्रमाण पत्रे आहेत. या पार्श्वभूमीवर न्यायालय व राज्य सरकारकडे मराठा आरक्षणाची मागणी कशी रेटायची, याबाबत संघटनांमध्ये मतमतांतरे आहेत. सर्वोच्च न्यायालयाने फेरविचार याचिकेवर निर्णय देईपर्यंत मराठा समाजाच्या मागासलेपणाची तपासणी करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडे नव्याने शिफारस व विनंती करायची नाही, अशी भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. तर न्यायालयीन सुनावणी रखडली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचे नेमके काय होणार, याबाबत समाजामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

# भगतसिंग कोश्यारी यांना राज्यपाल पदावरून हटवा

## शिवभक्त लोक आंदोलन समितीचा राज्य सरकारला इशारा

। मुंबई । महाईन्यूज ।

वादग्रस्त विधान करणारे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदावरून पंधरवड्यामध्ये हटवण्यात यावे, अन्यथा मुंबईमध्ये कोल्हापुरी चप्पल मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सोमवारी येथे झालेल्या शिवभक्त लोक आंदोलन समितीच्या सभेत देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी राज्यपाल कोश्यारी यांनी केलेल्या अवमानकारक विधानाचा निषेध करण्यासाठी तसेच कोश्यारी यांना पदावरून हटवण्यासाठी आंदोलनाची भूमिका निश्चित करण्याकरिता कोल्हापूरात कोल्हापुरी पायतान मार सभा झाली.

राज्यपाल कोश्यारी, भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी, पंकज चतुर्वेदी यांच्याकडून महापुरुषांविषयी बेताल विधाने केली जात असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी त्याचे लंगडे समर्थन करू नये. त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा, इशारा देऊन निमंत्रक वसंतराव मुळीक यांनी राज्यपालांना पदावरून न हटवल्यास मुंबईत गेट ऑफ इंडिया ते राजभवनपर्यंत मोर्चा काढण्याचा इशारा दिला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्यंकप्पा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेस गुलाबराव घोरपडे, बाजीराव नाईक, पंडित पोवार, आदींनी मनोगत व्यक्त केले.



# राऊतांवर अटकेची टांगती तलवार, प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी बेळगाव कोर्टाचं समन्स

## राऊतांना समन्स मिळाल्याने चर्चांना उधान

। सांगली। महाईन्यूज ।

प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी संजय राऊत यांना बेळगाव कोर्टाने समन्स पाठवण्यात आलं आहे. ३० मार्च २०१८ मध्ये राऊत यांनी बेळगावात प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी त्यांना समन्स पाठपण्यात आलं आहे. तर १ डिसेंबरला बेळगाव न्यायालयात हजर राहण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. मिळालेल्या माहिती नुसार संजय राऊत १ डिसेंबरला कोर्टात हजेरी लावणार आहेत.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी बंगळुरू इथं एक खळबळजनक वक्तव्य केलं होत. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यावर दावा करण्याच्या तयारीत आम्ही आहोत. या मुद्द्यावर आम्ही गांभीर्यानं विचार करत आहोत, असं कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणाले होते. त्यामुळे राज्यात कर्नाटक आणी महाराष्ट्रवाद पेटला आहे. आणि अशातच राऊतांना समन्स मिळाल्याने चर्चांना उधान आलं आहे. "सीमा भागातील लोकांच्या मागे शिवसेना उभी आहे, सीमा भागातील लोकांवर हल्ले केले, कायद्याची भिती दाखवली, तर महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटतील मी केलेल्या भाषणात प्रक्षोभक काय आहे हे मला अजून माहित नाही. २०१८ च्या भाषणाची दखल आत्ता घेत मला समन्स पाठवण्यात आलं आहे. त्यांच असं मत आहे मी कोर्टात जावं आणि तिथे माझ्यावर हल्ला व्हावा आणि मला अटक करण्यात यावं तुरूगात टाकावं अशा प्रकारचं कारस्थान माझ्या विरोधात चालू असल्याचं माझ्या कानावर आलं आहे.



**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी बंगळुरू इथं एक खळबळजनक वक्तव्य केलं होत. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यावर दावा करण्याच्या तयारीत आम्ही आहोत. या मुद्द्यावर आम्ही गांभीर्यानं विचार करत आहोत, असं कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणाले होते. त्यामुळे राज्यात कर्नाटक आणी महाराष्ट्रवाद पेटला आहे. आणि अशातच राऊतांना समन्स मिळाल्याने चर्चांना उधान आलं आहे. "सीमा भागातील लोकांच्या मागे शिवसेना उभी आहे, सीमा भागातील लोकांवर हल्ले केले, कायद्याची भिती दाखवली, तर महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटतील मी केलेल्या भाषणात प्रक्षोभक काय आहे हे मला अजून माहित नाही. २०१८ च्या भाषणाची दखल आत्ता घेत मला समन्स पाठवण्यात आलं आहे.**

# केरळमधल्या अदाणींच्या 900 दशलक्ष डॉलर्सच्या प्रकल्पाला हिंसाचाराचं गालबोट!

## हिंसाचारात 29 पोलीस कर्मचारी जखमी आणि अनेक वाहनांचे नुकसान

। गुवाहटी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उद्योगपती गौतम अदाणी यांचा तब्बल ९०० दशलक्ष डॉलर्सचा ड्रीम प्रोजेक्ट विझिंजम इंटरनॅशनल सपोर्ट लिमिटेडला हिंसाचाराचं गालबोट लागलं आहे. या प्रकल्पावरून सुरू असलेला वाद लवकर संपण्याची सध्या तरी कोणतीही चिन्ह दिसत नाहीत. एकाबाजूला केरळ सरकार, न्यायालय आणि जगातील तिसऱ्या क्रमांकच्या श्रीमंत व्यक्तीचा अदाणी समूह आहे आणि दुसऱ्या बाजूला मच्छिमारांसह स्थानिकांचा एक समूह आहे, ज्याचे नेतृत्व कथितरित्या लॅटिन कॅथोलिक चर्चचे प्रमुख लोक करत आहेत.

न्यायालयाच्या निर्णयाविरोधात गेल्याचा चर्चवर आरोप आहे. केरळ पोलिसांनी २६ नोव्हेंबर, शनिवार रोजी विझिंजम, तिरुवनंतपुरम येथे झालेल्या हिंसाचार प्रकरणी दाखल गुन्ह्यात आर्चबिशप डॉ. थॉमस जे नेट्टो यांना मुख्य आरोपी बनवले आहे. एफआयआर मध्ये म्हटले आहे की, आर्चबिशप यांनी अन्य धर्मगुरुंसोबत मिळून कट रचला. एका रिपोर्टनुसार पोलिसांनी याप्रकरणी १० गुन्हे नोंदवले असुन ५० बिशपसह सहायक बिशप चितुरदास आणि अन्य ४५ जणांची नावे आहेत.



**या प्रकल्पावरून सुरू असलेला वाद लवकर संपण्याची सध्या तरी कोणतीही चिन्ह दिसत नाहीत. एकाबाजूला केरळ सरकार, न्यायालय आणि जगातील तिसऱ्या क्रमांकच्या श्रीमंत व्यक्तीचा अदाणी समूह आहे आणि दुसऱ्या बाजूला मच्छिमारांसह स्थानिकांचा एक समूह आहे, ज्याचे नेतृत्व कथितरित्या लॅटिन कॅथोलिक चर्चचे प्रमुख लोक करत आहेत. न्यायालयाच्या निर्णयाविरोधात गेल्याचा चर्चवर आरोप आहे. केरळ पोलिसांनी २६ नोव्हेंबर, शनिवार रोजी विझिंजम, तिरुवनंतपुरम येथे झालेल्या हिंसाचार प्रकरणी दाखल गुन्ह्यात आर्चबिशप डॉ. थॉमस जे नेट्टो यांना मुख्य आरोपी बनवले आहे.**

# चीनमध्ये करोनाचा हाहाकार

## चीनमध्ये जनक्षोभ, करोना, टाळेबंदीविरोधात नागरिक रस्त्यावर

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मागील काही दिवसांपासून चीनमध्ये पुन्हा एकदा करोना संसर्ग वाढत आहे. करोनाग्रस्तांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे. याच कारणामुळे चीनमध्ये लॉकडाऊन आणि इतर प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी केली जात आहे. मात्र येथे चीनमध्ये टाळेबंदीला कडाडून विरोध होत आहे. येथे शांघाय, बीजिंग यासारख्या प्रमुख शहरांमध्ये लोक टाळेबंदीविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. लोकांकडून राष्ट्रध्यक्ष क्षी जिनपिंग यांना हटवावे अशी मागणी केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर चीनमधील 'झिरो कोव्हिड' धोरण काय आहे? नागरिक टाळेबंदीविरोधात रस्त्यावर का उतरले आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊया. झिरो कोव्हिड धोरणाला होतोय विरोध

शांघाय, बीजिंग यासारख्या मोठ्या शहरांमध्ये चीनमधील 'झिरो कोव्हिड' धोरणाला कडाडून विरोध होत आहे. झिरो कोव्हिड धोरणांतर्गत करोनाची लागण झालेली एखादी व्यक्ती आढळली की त्या भागात कडक टाळेबंदीचे आदेश दिले जातात.



# फडणवीसांना तेलंगणा सरकारचा दणका, मुख्यमंत्र्यांनी दौरा नाकारला

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



तेलंगणा राज्यात भाजपला पोलिसांनी जाहीर सभेला परवानगी नाकारली आहे. तेलंगणा पोलिसांनी काल (रविवारी) भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राज्य प्रमुख संजय कुमार यांना त्यांच्या प्रजा संग्राम यात्रेच्या पाचव्या टप्प्यासाठी आणि निर्मल जिल्ह्यातील भैंसा शहरात जाहीर सभेला परवानगी नाकारली. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, पोलिसांनी तेथील "सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील परिस्थिती" चे कारण देत कुमार यांना परवानगी नाकारली आहे.

आज (सोमवारी) प्रस्तावित जाहीर सभेला संबोधित करणाऱ्या भाजप नेत्यांमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश होता. आपल्या पदयात्रेच्या पाचव्या टप्प्यासाठी निर्मलला निघालेल्या कुमार यांना रविवारी रात्री जगतियाल जिल्ह्यात पोलिसांनी अडवले आणि परत जाण्यास सांगितले.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, भैंसा आणि इतर भागातील सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील परिस्थिती पाहता त्यांनी पदयात्रा आणि सार्वजनिक सभेला परवानगी नाकारली आहे. पोलिसांच्या कारवाईचा निषेध करत भाजप कार्यकर्त्यांनी जगतियाल आणि निर्मल जिल्ह्यातील विविध भागात निदर्शने केली. पोलिसांच्या कारवाईत पक्षाचे काही कार्यकर्ते जखमी झाल्याचा आरोप भाजपच्या राज्य युनिटने केला आहे. मोर्चा आणि जाहीर सभेला राज्य सरकारने तत्काळ परवानगी द्यावी, अशी मागणी भाजप पक्षाने केली आहे.

याप्रकरणी भाजपने तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

# EPFO पेंशन नियमांमध्ये होऊ शकतो मोठा बदल!

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जर तुम्ही कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या पेंशन योजनेचे लाभार्थी असाल तर तुमच्यासाठी ही मोठी आणि आनंदाची बातमी ठरेल. केंद्र सरकार लवकरच कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या पेंशन योजनेची वेतन सीमा वाढवू शकते. EPFO कर्मचारी राज्य विमा महामंडळ अंतर्गत वेतनमान 21000 उच्च वेतनश्रेणीशी लिंक करणार असल्याचे कळते आहे. यामुळे ज्यांचे मासिक वेतन 21000 रुपयांपर्यंत आहे अशा कर्मचाऱ्यांना आता दुप्पट फायदा होणार आहे.

सध्या, EPFO च्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) योजनेतील सेवानिवृत्ती बचत योजनेसाठी वेतन मर्यादा 15,000 रुपये प्रति महिना आहे, ती वाढवून 21,000 रुपये करण्यात येणार आहे. सरकारने यासाठी मंजुरी दिल्यास आणखी 75 लाख कर्मचारी ईपीएफओच्या कक्षेत येतील. आता त्यांची संख्या ६.८ कोटी झाली आहे. शेवटची पगार मर्यादा 2014 मध्ये 6,500 रुपये प्रति महिना वरून वाढवण्यात आली होती

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पगार मर्यादा वाढवण्यासाठी लवकरच तज्ज्ञांची समिती स्थापन केली जाऊ शकते, जी महागाईनुसार मर्यादा निश्चित करेल. ईपीएफओच्या कक्षेत येण्यासाठी त्याचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल. आता 15,000 रुपये 12% दराने मासिक वेतन 1,800 रुपये आहे.

जर वेतन मर्यादा 21,000 रुपये केली तर 12% दराने पीएफ योगदान 2,520 रुपये होईल. यामुळे सेवानिवृत्ती निधी वाढेल. त्यामुळे निवृत्ती वेतनधारकांना सर्वाधिक लाभ मिळू शकतो. या योजनेअंतर्गत, कर्मचाऱ्यांच्या पगारातून 12% रक्कम कापून पेन्शन योजनेत जमा केली जाते आणि कंपनीला तीच रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावी लागते. म्हणजे एका दिवसात कर्मचाऱ्यांची बचत दुप्पट होईल. यानंतर, EPFO कडून व्याज प्राप्त होते जे कोणत्याही बँकेच्या FD पेक्षा जास्त आहे.




### न्यायालयाने ही मर्यादा रद्द केली होती

**विशेष म्हणजे, केंद्र सध्या EPFO च्या कर्मचारी पेन्शन योजनेसाठी दरवर्षी सुमारे 6,750 कोटी रुपये देते, ज्यामध्ये EPFO या योजनेसाठी सदस्यांच्या एकूण मूळ वेतनाच्या 1.16 टक्के योगदान देते. नुकतेच, सर्वोच्च न्यायालयाने 2014 च्या कर्मचारी पेन्शन (सुधारणा) योजनेची वैधता कायम ठेवली, जरी न्यायालयाने पेन्शन फंडात सामील होण्यासाठी 15,000 रुपये मासिक वेतनाची मर्यादा कमी केली..**

# कियारा अन् सिद्धार्थ ह्या दिवशी अडकणार विवाह बंधनात?

बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या नात्याची चर्चा तर अनेक दिवसांपासून सुरु आहे. बॉलीवूडमधील सर्वाधिक चर्चेत असलेली जोडी आहे. बऱ्याच काळापासून ते दोघे एकमेकांना डेट करत आहे. शेरशहापासून त्यांच्यातील केमिस्ट्री ही आणखीनच प्रेक्षकांना भावली होती. दोघेही लवकरच लग्नाचा विचार करत असल्याचाही दावा केला जात आहे. काही दिवसांपासून ही दोघे लग्नाची तयारी करत असल्याचं बोलंल जात होतं.



दरम्यान, कियारा अडवाणीने एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये तिने लवकरच एक मोठी घोषणा करणार असल्याचं सांगितलं आहे. त्यामुळे कियाराच्या या पोस्टनंतर पुन्हा एकदा तिच्या आणि सिद्धार्थच्या लग्नाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे . कियाराने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर चाहत्यासोबत एक व्हिडिओ शेअर केला आहे. काही सेकंदांच्या या व्हिडिओत कियारा तिच्या अदा दाखवत आहे. या व्हिडीओसोबत कियाराने दिलेल्या कॅप्शनमूळे खरी चर्चा रंगली आहे. यात तिने लिहिलंय की, 'हे जास्त काळ लपवून ठेवू नका! लवकरच येत आहे... सोबत रहा... 2 डिसेंबर.' कियाराची ही पोस्ट सोशल मीडियावर वाऱ्यासारखी व्हायरल झाली. आता सिद्धार्थ आणि कियाराचे चाहते तिच्या लग्नाची घोषणा करणार असल्याचा अंदाज लावत आहेत. अनेकांनी तर कमेंट सेक्शनमध्ये म्हटलं की लग्नाचा मुद्दा असेल तर तो जुना झाला आहे. यावर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'तुम्ही आणि सिद्चे लग्नबाबत झालं असेल तर दुसरे रहस्य सांगं. हे संपूर्ण देशाला माहीत आहे.'

# रितेश-जेनेलियाला मोठा धक्का! चौकशीचे आदेश

मराठी - हिंदी चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेता, निर्माता रितेश देशमुख आणि त्याची पत्नी अभिनेत्री जेनेलिया यांच्या अडचणीत आता वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. लातूरमधील भुखंड प्रकरण हे त्यांना भोवणार की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्याला कारण म्हणजे राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे यांनी चौकशीचे आदेश दिले आहे.



अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांच्यावर गंभीर आरोप भाजपनं केले होते. त्यामुळे वेगळ्याच चर्चेला उधाण आले होते. लातूरमधील 16 उद्योजकांना डावलून देशमुखांना अवघ्या दहा दिवसांत भुखंड मंजूर करण्यात आल्याचा आरोप भाजपनं केला गेला होता. लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेनं त्यांना 116 कोटींचा पुरवठा काही दिवसातच कसा काय केला गेला असा सवालही यानिमित्तानं समोर आला आहे. रितेश आणि जेनेलिया यांच्या कंपनीला अवघ्या एका महिन्यात 120 कोटींचे कर्ज कसे देण्यात आले आहे. ते कसे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. एका मराठी वृत्त वाहिनींनं व्हायरल केलेल्या बातमीमध्ये रितेश आणि जेनेलिया यांच्यावर वेगवेगळे आरोप करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. हाती आलेल्या माहितीनुसार, कमी कालावधीत अवघ्या महिन्याच्या आत त्यांना कर्ज मिळाले. त्या बँकेने आतापर्यंत किती जणांना कर्ज दिले?

# यामी गौतमचा ‘लॉस्ट’ हा थरारपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

बॉलिवूडच्या अभिनेत्री कायमच आपल्या चित्रपटांमुळे, लुक्समुळे चर्चेत असतात. अभिनेत्री यामी गौतम अशीच एक बॉलिवूडची गुणी अभिनेत्री. आज तिचा वाढदिवस आहे. यामी गौतमचा जन्म हिमाचल प्रदेशच्या बिलासपुर येथे झाला. सध्या यामी चर्चेत आली आहे ती तिच्या आगामी चित्रपटामुळे., ‘लॉस्ट’ हा तिचा चित्रपट लवकरच ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. यामीचा लॉस्ट हा चित्रपट एक थ्रिलर असून सत्य घटनांवर आधारित असणार आहे. एक नाट्यकर्मीच्या अचानक





बेपत्ता होण्यामागची सत्यता जाणून घेण्यासाठी एक तरुण क्राईम रिपोर्टर कामाला लागतो अशी या चित्रपटाची कथा असणार आहे. श्यामल सेनगुप्ता यांनी चित्रपटाचे लेखन केले असून संवाद रितेश शाह यांचे आहेत. नुकताच हा चित्रपट गोव्यातील इफ्फी चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात आला. यामीदेखील या चित्रपटाबाबत उत्सुक आहे . हा चित्रपट झी ५ वर लवकरच प्रदर्शित होणार आहे. निर्मात्यांनी अजून तारीख जाहीर केली नाही . या चित्रपटाची निर्मिती झी स्टुडिओजने केली आहे. ‘लॉस्ट’ मध्ये पंकज कपूर, राहुल खन्ना, नील भूपालम, पिया बाजपी आणि तुषार पांडे यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. अनिरुद्ध रॉय चौधरी यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.

# राणादा-पाठकबाईंपाठोपाठ आणखी एका रिल लाइफ जोडीची लगीनघाई...

‘तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या घराघरात पोहोचलेला राणादा आणि पाठकबाई म्हणजेच अभिनेता हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर हे दोघेही सातत्याने चर्चेत आहे. ते दोघेही लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. सध्या त्या दोघांच्याही घरी लगीनघाई सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच आता छोट्या पडद्यावरील आणखी एक रिल लाईफ जोडी विवाहबंधनात अडकणार आहे. नुकतंच त्या दोघांच्या मेहंदी सभारंभाचे फोटो समोर आले आहेत.





झी मराठी वाहिनीवरील ‘ती परत आलीये’ ही मालिका विशेष चर्चेत ठरली होती. ही मालिका अवघ्या १०० दिवसांची असली तरी त्या मालिकेने अगदी पहिल्या भागापासून प्रेक्षकांचे भरभरुन मनोरंजन केले होते. या मालिकेतील प्रत्येक पात्र कायमच चर्चेत राहिले. या मालिकेत येणारी उत्कंठावर्धक वळण, गूढ रहस्य यामुळे तिला चांगला प्रतिसाद मिळाला. या मालिकेतील बाबूराव, सायली, सतेज, रोहिणी, अभय, हणम्या या कलाकारांना चांगली प्रसिद्धी मिळाली. या मालिकेतील विक्रांत आणि रोहिणीच्या भूमिकेत झळकलेला अभिनेता नचिकेत देवस्थळी आणि तन्वी कुलकर्णी लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. त्यांच्या दोघांच्या मेहंदीचे फोटो समोर आले आहेत. अभिनेता नचिकेत देवस्थळी याने नुकतंच त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर मेहंदीच्या सभारंभाचे काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोत ती परत आलीय मालिकेतील काही कलाकारही पाहायला मिळत आहे. यावेळी त्याची होणारी पत्नी अभिनेत्री तन्वी कुलकर्णीच्या हातावर मेहंदी सजल्याचे पाहायला मिळत आहे. याचे काही फोटो त्याने शेअर केले आहेत. त्यामुळे आता लवकरच ते दोघेही विवाहबंधनात अडकणार आहेत.

अभिनेत्री तन्वी कुलकर्णी आणि नचिकेत देवस्थळी यांचा काही महिन्यांपूर्वीच साखरपुडा पार पडला होता. तन्वीने ‘ती परत आलीये’या मालिकेत रोहिणीची भूमिका साकारली होती. तर नचिकेत देवस्थळी याने या मालिकेत विक्रांतची भूमिका साकारली होती.

# ‘हिऱ्याच्या शोधात आपण सोने गमावले’

## मोहम्मद कैफने विश्वचषकापूर्वी टीम इंडियाला दिला इशारा

**पुणे ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२२ मधील निराशाजनक कामगिरीनंतर टीम इंडियावर जोरदार टीका होत आहे. यासह, आता संपूर्ण जगाचे लक्ष एकदिवसीय क्रिकेटकडे वळले आहे. कारण पुढील वर्षी एकदिवसीय विश्वचषक भारतात होणार आहे. त्याचबरोबर भारत देखील आयसीसी एकदिवसीय विश्वचषक यजमानपदासाठी सज्ज झाला आहे. अशात माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने भारतीय संघाल एक इशारा दिला आहे.

एकदिवसीय विश्वचषक २०२३ ही स्पर्धा भारतात खेळवली जाणारा आहे. त्यामुळे भारतीय संघाद्दल बोलायचे, तर एफटीपी कॅलेंडरनुसार, भारत विश्वचषकापूर्वी २५ एकदिवसीय सामने खेळणार आहे, त्यापैकी दोन आधीच न्यूझीलंडविरुद्ध चालू असलेल्या मालिकेत खेळले गेले आहेत. यावर आपले मत मांडताना



भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफला वाटते की, व्यवस्थापनाने लवकरच विश्वचषकात खेळणाऱ्या खेळाडूंना ओळखण्याची गरज आहे. भारत-न्यूझीलंड मालिकेचे अधिकृत प्रसारक प्राइम व्हिडिओवर बोलताना कैफ म्हणाला, “अलीकडेच विश्वचषक जिंकलेल्या इंग्लंड संघाचे सरासरी वय ३१ वर्षे होते. त्यामुळे अनुभवी खेळाडूंचा नेहमीच कोणत्या ना कोणत्या रुपाने उपयोग होतो. जर भारताला विश्वचषकाची तयारी सुरू करायची असेल, तर त्यांना न्यूझीलंडविरुद्धच्या सध्याच्या मालिकेपासून सुरुवात करावी लागेल. कारण आता फारसे एकदिवसीय सामने उरलेले नाहीत, कदाचित विश्वचषकापर्यंत फक्त २५ वनडे असतील.”

# क्रिकेटच नाही तर फुटबॉलच्या मैदानातही सॅमसनची क्रेझ!

## संजूच्या समर्थनार्थ स्टेडियममध्ये झळकले बॅनर

**दोहा।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

यष्टिरक्षक-फलंदाज संजू सॅमसनची न्यूझीलंडविरुद्धच्या भारतीय संघातून हकालपट्टीमुळे त्याच्या चाहत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. यातील काही चाहते सॅमसनच्या समर्थनार्थ बॅनर घेऊन फिफा विश्वचषक २०२२ सामना पाहण्यासाठी कतारला पोहोचले. सॅमसन दीर्घकाळापासून आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करत आहे, पण त्याला भारतीय संघात सातत्यपूर्ण संधी मिळत नाहीयेत. या कारणामुळे संजू सॅमसनचे चाहते निवड समिती आणि भारतीय संघ व्यवस्थापनावर नाराज आहेत.

गेल्या काही महिन्यांत जेव्हा




### सॅमसन दुसऱ्या सामन्यात का खेळला नाही

दुसऱ्या सामन्यात संजू सॅमसनच्या जागी दीपक हुडाचा संघात समावेश करण्यावर भारतीय कर्णधार शिखर धवन म्हणाला की संघात सहावा गोलंदाजीचा पर्याय नाही. त्यामुळे संजू सॅमसनच्या जागी दीपक हुडाचा संघात समावेश करण्यात आला. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय पूर्ण होऊ शकला नाही आणि पावसामुळे तो रद्द करावा लागला. मालिकेतील तिसरा सामना ३० नोव्हेंबरला ख्राईस्टचर्च येथे होणार आहे.

जेव्हा संघाची घोषणा होते किंवा संजू सॅमसनला कोणत्याही सामन्यात खेळण्याची संधी मिळत नाही तेव्हा त्याचे चाहते सोशल मीडियावर नाराजी व्यक्त करतात. सॅमसनला भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी२० मालिकेत खेळण्याची संधी मिळाली नाही, मात्र एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात तो भारतीय संघाचा भाग होता. या सामन्यात त्याने चांगली कामगिरी करत श्रेयस अय्यरसोबत शतकी भागीदारी केली आणि भारताला ३०० पार पोहचवून संकटातून बाहेर काढले. असे असतानाही संघाचा समतोल नीट साधला जात नसल्याने त्याला दुसऱ्या सामन्यात संघातून वगळण्यात आले.

यानंतर संजूचे चाहते चांगलेच संतापले. काही चाहते संजू सॅमसनच्या समर्थनार्थ बॅनर घेऊन कतारमध्ये फिफा विश्वचषक सामना पाहण्यासाठी गेले होते. बॅनरवर “सामना, संघ आणि खेळाडू यांच्या पलीकडे, संजू सॅमसन, आम्ही तुझ्यासोबत आहोत.” यासोबतच बॅनरमध्ये संजू सॅमसनचे अनेक फोटो होते, ज्यामध्ये तो राजस्थान रॉयल्स संघाच्या जर्सीत दिसत होता.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही